दै. लोकपत्र दि. ०९.०६.२५

# बाभुळगावच्या आखाड्यावरून चोरीच्या तीन मोटारसायकली जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड/प्रतिनिधी**

बाभुळगाव शिवारातील शेतातील एका आखाड्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चोरीस गेलेल्या तीन मोटारसायकली दि.८ रोजी जप्त केल्या. या प्रकरणी दोन विधीसंघर्षीत बालकांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. चोरी प्रकरणातील सराईत गुन्हेगारांची चौकशी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असतांना स्थानिक गुन्हे शोखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना नांदेड तालुक्यातील बाभुळगाव येथील एका शेतीच्या आखाड्यावर काही चोरट्यांनी तीन मोटारसायकली आणल्याची गुप्त माहिती मिळाली. पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, शंकर नेसनवाड, सखाराम नवघरे, राजु डोंगरे, संजय राठोड, सिध्दार्थ सोनसळे, महेश बडगु यांचे पथक पाठवून कारवाईच्या सुचना उदय खंडेराय यांनी दिल्या होत्या. दि.८ रोजी बाभुळगाव शिवारातील त्या आखाड्यावर पोलिसांनी छापा टाकून तीन मोटारसायकली जप्त केल्या. शिवाय त्या ठिकाणी असलेल्या दोन विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेवून त्यांची चौकशी केली असता तीन जणांनी मिळून सदरील मोटारसायकल नांदेड शहर घुंगराळा आणि अर्धापुर येथून चोरून आणल्याची माहिती दिली.

# विधीसंघर्ष बालकांकडून मोटार सायकल चोरीचे तीन गुन्हे उघड

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** नांदेड पोलिसांनी केलेल्या विमानतळ, कुंटूर, अर्धापूर पोलिस ठाण्याअंतर्गत विधीसंघर्ष बालकांकडून मोटारसायकल चोरीचे तीन गुन्हे उघड केले असून १ लाख रुपये किंमतीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत.



पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ८ जून रोजी पोउपनि नागनाथ तुकडे व साईनाथ पुयड या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्याअंतर्गत अभिलेखावरील माली गुन्ह्यातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेत मिळालेल्या गुप्त माहितीवरुन तीन विधीसंघर्ष बालकांकडून वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केलेल्या मोटासायकली जप्त केल्या. सदर मोटारसायकली शेतातील एका आखाड्यावर ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरुन पोलिसांनी सदर ठिकाणी हजर असलेल्या दोन विधीसंघर्ष बालकांची मोटासायकलीबाबत विचारपूस केली असता त्यांनी घुंगराळा ता. नायगाव, नांदेड शहर व अर्धापूर येथुन मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून पोलिसांनी १ लाख रुपये किंमतीच्या मोटारसायकली जप्त केल्या. स्थानिक गुन्हे शाखेतील पोनि उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नागनाथ तुकडे, साईनाथ पुयड, अंमलदार शंकर मैसनवाड, सखाराम नवघरे, राजू डोंगरे, शंकर राठोड, सिध्दार्थ सोनसळे, सायबर सेलचे महेश बडगुजर यांनी सदर कारवाई केली आहे.

दै. देशोन्नती